# First Language

# 1.1 मराठी

## (प्रथम भाषा)

**प्रास्ताविक**

भाषा ही मानवाची विशेष निर्मिती आहे. मानवी व्यवहाराचे ते एक प्रभावी माध्यम आहे. भाषिक व्यवहारासाठी, विचार व्यक्त करण्यासाठी आणि स्वत:च्या विकासासाठी मानवाने तिचा सातत्याने विकास केला. ज्ञानसंपादनाचे आणि अभिव्यक्तीचे भाषा हे एक समर्थ साधन आहे.

भाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कारित करून, त्यांच्या भाषेचे कलात्मक रूप जोपासणे आणि ते वृद्धिंगत करणे अपरिहार्य आहे.

देशप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसमभाव, नैतिक मूल्ये, निसर्गप्रेम, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक जाणीव यांचा विकास भाषेमुळेच साधला जातो.

**सर्वसामान्य उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्याची आत्मप्रकटीकरणात्मक भाषिक कौशल्ये विकसित करणे.

२) भाषाविषयक ग्रहणशक्तीचा विकास करणे.

३) वाङ्मयाबद्दल आवड निर्माण करणे.

४) सत्प्रवृत्तींचे पोषण करून चिकित्सक वृत्तीची जोपासना करणे.

५) नवनिर्मिती व आत्माविष्कार शक्तींचा विकास करणे.

६) आधुनिक भाषाविज्ञानाची ओळख करून देणे.

७) प्रचलित जीवनातील वास्तविकता लक्षात आणून देऊन दहशतवाद, भ्रष्टाचार, लोकसंख्या वाढ, ढासळलेली नीतिमूल्ये यांची जाणीव निर्माण करून सर्वांना समान संधी देण्याची व एकसंध समाज घडविण्याची प्रेरणा देणे.

८) दृक्-श्राव्य साधनांच्या द्वारे भाषिक अनुभव वाढविणे.

९) विविध वाङ्.मयीन प्रवाह, प्रकार, प्रवृत्ती यांचे आकलन वाढविणे.

१०) विघातक शक्तींनी निर्माण केलेली अस्थिरता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांत आत्मविश्वास निर्माण करून संकटांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणे.

११) माहिती-तंत्रज्ञान, पर्यावरण यांची आणि जागतिकीकरणाच्या समस्यांची ओळख करून देणे व त्यांच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना समर्थ करणे.

१२) विद्यार्थ्यांमध्ये स्वयं-अध्ययनाची आवड निर्माण करणे व त्यांना अभ्यासासाठी प्रवृत्त करणे.

१३) भाषेचा दैनंदिन व्यवहारात उपयोग करता यावा या दृष्टीने व्यावहारिक भाषेत प्रावीण्य मिळवून देणे.

**उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढवून त्याचा दैनंदिन व्यवहारात उपयोग करण्यास शिकविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेची प्रेरणा निर्माण करून व्यावहारिक भाषेत प्रावीण्य मिळवून देणे.

२) श्रवण, संभाषण, भाषण, वाचन, लेखन, आकलन आणि स्वतंत्र अभिव्यक्ती या क्षमता व कौशल्ये यात वाढ करणे.

३) ज्ञान आणि आनंदप्राप्तीसाठी वाचनाची आवड निर्माण करणे.

४) मराठी भाषेतील विविध साहित्यिकांची व साहित्यप्रकारांची ओळख करून देणे.

५) विद्यार्थ्यांच्या ठिकाणी आपली भाषा, साहित्य, संस्कृती, राष्ट्र, मानवता, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसमभाव व स्त्री-पुरुष समानता, वडीलधाऱ्यांबद्दल आदरभावना, नैतिक मूल्ये, निसर्गप्रेम, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक जाणीव इ. गुणांची वाढ व जोपासना करणे.

६) अन्य भाषाभगिनी तसेच मराठीच्या विविध बोलीभाषांबद्दल आपुलकी निर्माण करणे.

७) चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, संगणक, ई-मेल, इंटरनेट, मोबाईल इ. दृक्-श्राव्य साधनांच्या द्वारे भाषिक अनुभव वाढविणे.

८) माहिती तंत्रज्ञान, पर्यावरण आणि जागतिकीकरणाच्या समस्यांची ओळख करून देऊन त्यांच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी समर्थ करणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये स्वयं-अध्ययनाची आवड निर्माण करून त्यांना अभ्यासासाठी प्रवृत्त करणे.

१०) भाषेची मूलभूत संरचना आणि अभ्यासक्रमातील व्याकरणाचे घटक समजावून देणे.

## इयत्ता ९ वी

**गद्य विभाग** सुमारे ८० पृष्ठे

(प्रस्तावना, टीपा, स्वाध्याय वगळून) स्वयंअध्ययनासाठी पाठ नसेल. स्थूलवाचन हा स्वतंत्र विभाग असेल (४ पाठ) प्राचीन गद्य - २ पाठ

**पद्य विभाग**

सुमारे २०० ओळी पैकी प्राचीन पद्य ५० ओळी. (अभंग, पंडिती काव्य, पद, विराणी, पोवाडा, फटका इ.)

**व्याकरण**

१. अलंकार-यमक, अनुप्रास, उपमा, अनन्वय.

२. अव्यये - क्रियाविशेषण,केवलप्रयोगी, उभयान्वयी, शब्दयोगी.

३. दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे.

४. पर्यायी शब्द.

५. लेखननियमांनुसार शब्द लिहिणे (लेखननियम पाठ्यपुस्तकात देणे आवश्यक).

६. विरामचिन्हे - विरामचिन्हांचा वापर करणे.

**वाक्प्रचार व म्हणी**

अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे.

**निबंध लेखन**

चित्रावरून,प्रसंगावरून, कल्पनाविस्तार, आत्मवृत्त

(निबंधासाठी प्रमाण भाषेतील/बोली भाषेतील लेखन चालेल). साधकबाधक मुद्दे मांडणे आवश्यक. अभिव्यक्तीस प्राधान्य.

**गद्य आकलन/सारांशलेखन -** अपठित गद्यउतारा.

**उपयोजित मराठी**

१. पत्रलेखन - निमंत्रण, आभार, अभिनंदन, मागणी, चौकशी.

२. वृत्तलेखन

३. जाहिरात लेखन

४. कथापूर्ती

५. बोलीभाषेतील उतारे -बोलीभाषेतील उताऱ्यांचे प्रमाणभाषेत रूपांतर करणे.

**संवादकौशल्ये :** (तोंडी परीक्षा)

**भाषापरिचय :** भाषेची संरचना (पाठ्यपुस्तकात देणे, गुण नाहीत).

**पूरक वाचन** वाचनकौशल्यासाठी वाचनीय पुस्तकांची यादी देणे (गुण नाहीत).

शालेय स्तरावर पूरकवाचनाच्या पुस्तकांवर आधारित १० गुणांची परीक्षा शाळा घेऊ शकतील (परीक्षा घेणे सक्तीचे नाही).

## इयत्ता १० वी

**गद्य विभाग** सुमारे ८० पृष्ठे

(प्रस्तावना, टीपा, स्वाध्याय वगळून) स्वयंअध्ययनासाठी पाठ नसेल. स्थूलवाचन हा स्वतंत्र विभाग असेल - ४ पाठ. प्राचीन गद्य २ पाठ.

**पद्य विभाग** सुमारे २०० ओळीपैकी प्राचीन पद्य ५० ओळी. (अभंग, पंडिती काव्य, पद, विराणी, पोवाडा, फटका इ.).

**व्याकरण**

१) अलंकार - रूपक, उत्प्रेक्षा, व्यतिरेक,

२) समास – द्वंद्व (इतरेतर, वैकल्पिक, समाहार), द्विगु, अव्ययीभाव.

३) पर्यायी शब्द

४) लेखननियमांनुसार शब्द लिहिणे (लेखननियम पाठ्यपुस्तकात देणे आवश्यक).

५) विरामचिन्हे – विरामचिन्हांचा वापर करणे.

**वाक्प्रचार व म्हणी :** अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे.

**निबंधलेखन** :

प्रसंगावरून, कल्पनाविस्तार, आत्मवृत्त, वैचारिक निबंधासाठी प्रमाणभाषेतील बोलीभाषेतील लेखन चालेल. साधकबाधक मुद्दे मांडणे आवश्यक. अभिव्यक्तीस प्राधान्य.

**गद्य आकलन/सारांशलेखन –** अपठित गद्यउतारा.

**उपयोजित लेखन**

१. पत्रलेखन – कौटुंबिक, मागणी, विनंती, तक्रार.

२. निमंत्रणपत्रिका

३. आवेदनपत्र

४. अहवाललेखन – (शालेय कार्यक्रम)

५. अभिप्रायलेखन(पुस्तक, नाटक, संगीत, चित्र)

६. बोलीभाषेतील उतारे (बोलीभाषेतील उताऱ्यांचे प्रमाणभाषेत रूपांतर करणे)

**संवादकौशल्ये** : (तोंडी परीक्षा)

**भाषापरिचय** : चिन्हव्यवस्था (पाठ्यपुस्तकात देणे, गुण नाहीत)

**पूरक वाचन :** वाचनकौशल्यासाठी वाचनीय पुस्तकांची यादी देणे (गुण नाहीत).